पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६७५/२०१८
दिनांक : १२/१०/२०१८

प्रति,

मा......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.


विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक **१९/१०/२०१८** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **१९/१०/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **१२**

दिनांक : **१९/१०/२०१८** वेळ : स.**११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **१९/१०/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक **०५/१०/२०१८** रोजी झालेल्या सभेचा ( **कार्यपत्रिका क्रमांक ११** ) सभावृत्तांत कायम करणे.

---------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “अ” क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात प्रभाग क्र.१९ अंतर्गत बी ब्लॉक, सुदर्शन नगर, गावडे कॉलनी, लोकमान्य हॉस्पीटल परिसर इ. भागाचा समावेश होतो. सदर भागामध्ये नागरिकांसाठी व तरंगत्या लोकसंखेसाठी मनपाने विविध ठिकाणी सार्वजनिक स्वच्छता गृहांची व्यवस्था केली आहे. सदर स्वच्छतागृह दैनंदिन वापरामुळे ना दुरुस्त होतात. स्वच्छता गृहे सुस्थितीत ठेवणे शहराच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रभाग क्र.१९ मधील एकुण ११ ब्लॉक मध्ये ४१ सिट्स इतकी सार्वजनिक शौचालये आहेत. तसेच मनपाच्या ताब्यातील इतर इमारतीमध्ये सुद्धा स्वच्छतागृहे आहेत. सदर स्वच्छतागृहांची कालबद्ध पद्धतीने दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामाचा समावेश सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्वच्छ महाराष्ट्र/स्वच्छ भारत अभियान प्रकल्प अमलबजावणी कक्ष विभागाचे दि.२१/०५/२०१८ व दि.०३/०८/२०१८ रोजीचे पत्रांवये सार्वजनिक स्वच्छता गृहांची देखभाल दुरुस्तीची कामे विना विलंब करणे करिता त्यांचे कडे असलेल्या सामुदायिक व सार्वजनिक शौचालय दुरूस्ती या लेखाशीर्षातून निविदा काढणे विषयी सूचना केल्या आहेत. सदर कामासाठी सन २०१८-१९ च्या मनपा अंदाजपत्रकामध्ये पान क्र.२२८ अ.क्र.१-डी वर र.रू.५,००,००,०००/-इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार समक्ष जागेवर पाहणी करुन राज्यस्तरीय दरसुची सन २०१७-१८ चे मंजुर दरपृथ्थकरणानुसार अंदाजपत्रक तयार केले असून निविदा र.रू.२३,६६,५६८/- इतकी येत आहे. सदर कामासाठी स्वतंत्र प्रशासकीय मान्यता उपलब्ध नाही. सदर कामाची अंदाजपत्रकीय र रु.२९,००,०००/- इतकी येत आहे. सदर कामाला प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

**(दिनांक १९/१०/२०१८ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “अ” क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात प्रभाग क्र.१४ अंतर्गत आकुर्डी दत्तवाडी, विठ्ठलवाडी, विवेकनगर, काळभोरनगर, मोहननगर, चिंचवड स्टेशन इ. भागाचा समावेश होतो. सदर भागामध्ये नागरिकांसाठी व तरंगत्या लोकसंखेसाठी मनपाने विविध ठिकाणी सार्वजनिक स्वच्छता गृहांची व्यवस्था केली आहे. सदर स्वच्छतागृह दैनंदिन वापरामुळे ना दुरुस्त होतात. स्वच्छता गृहे सुस्थितीत ठेवणे शहराच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रभाग क्र.१४ मधील एकुण २८ ब्लॉक मध्ये २६५ सिट्स इतकी सार्वजनिक शौचालये आहेत. तसेच मनपाच्या शाळांमध्ये व मनपाच्या ताब्यातील इतर इमारतीमध्ये सुद्धा स्वच्छतागृहे आहेत. सदर स्वच्छतागृहांची कालबद्ध पद्धतीने दुरूस्ती करणे आवश्यक आहे.. त्यामुळे सदर कामाचा समावेश सन २०१८-१९च्या अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्वच्छ महाराष्ट्र/स्वच्छ भारत अभियान प्रकल्प अमलबजावणी कक्ष विभागाचे दि.२१/०५/२०१८ व दि.०३/०८/२०१८ रोजीचे पत्रांवये सार्वजनिक स्वच्छता गृहांची देखभाल दुरुस्तीची कामे विना विलंब करणे करिता त्यांचे कडे असलेल्या सामुदायिक व सार्वजनिक शौचालय दुरूस्ती या लेखाशीर्षातून निविदा काढणे विषयी सूचना केल्या आहेत. सदर कामासाठी सन २०१८-१९ च्या मनपा अंदाजपत्रकामध्ये पान क्र.२२८ अ.क्र.१-डी वर र.रू.५,००,००,०००/-इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार समक्ष जागेवर पाहणी केली असता राज्यस्तरीय एस.एस.आर सन २०१७-१८ चे मंजुर दरपृथ्थकरणानुसार अंदाजपत्रक तयार केले असून निविदा र.रू.४१,७४,६७२/- इतकी येत आहे. सदर कामासाठी एकत्रित प्रशासकीय मान्यता ठरावात या कामाला प्रशासकीय मान्यता उपलब्ध नाही. सदर कामाची अंदाजपत्रकीय र रु.५०,००,०००/- इतकी येत आहे. सदर कामाला प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

**(दिनांक १९/१०/२०१८ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “अ” क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात प्रभाग क्र.१५ अंतर्गत प्राधिकरण से.क्र. २३, २४, २५, २६, २७, २७अ, २८, निगडी गावठाण, आकुर्डी गावठाण, गंगानगर परिसर इ.भागाचा समावेश होतो. सदर भागामध्ये नागरिकांसाठी व तरंगत्या लोकसंखेसाठी मनपाने विविध ठिकाणी सार्वजनिक स्वच्छता गृहांची व्यवस्था केली आहे. सदर स्वच्छतागृह दैनंदिन वापरामुळे ना दुरुस्त होतात. स्वच्छता गृहे सुस्थितीत ठेवणे शहराच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रभाग क्र.१५ मधील एकुण १७ ब्लॉक मध्ये १४७ सिट्स इतकी सार्वजनिक शौचालये आहेत. तसेच मनपाच्या ताब्यातील इतर इमारतीमध्ये सुद्धा स्वच्छतागृहे आहेत. सदर स्वच्छतागृहांची कालबद्ध पद्धतीने दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामाचा समावेश सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्वच्छ महाराष्ट्र/स्वच्छ भारत अभियान प्रकल्प अमलबजावणी कक्ष विभागाचे दि.२१/०५/२०१८ व दि.०३/०८/२०१८ रोजीचे पत्रांवये सार्वजनिक स्वच्छता

गृहांची देखभाल दुरुस्तीची कामे विना विलंब करणे करिता त्यांचे कडे असलेल्या सामुदायिक व सार्वजनिक शौचालय दुरूस्ती या लेखाशीर्षातून निविदा काढणे विषयी सूचना केल्या आहेत. सदर कामासाठी सन २०१८-१९ च्या मनपा अंदाजपत्रकामध्ये पान क्र.२२८ अ.क्र.१-डी वर र.रू.५,००,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार समक्ष जागेवर पाहणी करुन राज्यस्तरीय दरसुची सन २०१७-१८ चे मंजुर दरपृथ्थकरणानुसार अंदाजपत्रक तयार केले असून निविदा र.रू.**४१,६८,१२१**/- इतकी येत आहे. सदर कामासाठी स्वतंत्र प्रशासकीय मान्यता उपलब्ध नाही. सदर कामाची अंदाजपत्रकीय र रु.५०,००,०००/- इतकी येत आहे. सदर कामाला प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

**(दिनांक १९/१०/२०१८ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

विषय क्र.४) महापालिका आस्थापनेवर " सह शहर अभियंता (स्था) " या अभिनामाची एकूण ०३ पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० मध्ये शासन मंजूर आहेत. प्रस्तुतच्या पदाकरीता शासन निर्णयाप्रमाणे निर्धारित केलेली अर्हता

अ) शासन निर्णय क्र.पीसीसी-३०९१/८६९/प्र.क्र.१४४/९१/नवि-२२, दि.१८/०४/९४ आणि क्र.पीसीसी-३०९४/११०९/प्र.क्र.२८८/९४/नवि-२२, दि.२५/०८/१९९८ नुसार पदोन्नती –

१. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी (बी.ई.सिव्हील)
२. उपअभियंता या पदावरील १० वर्षे सलग सेवा अनुभव आवश्यक किंवा
३. कार्यकारी अभियंता या पदावरील कामकाजाचा सलग ५ वर्षे अनुभव.

ब) शासन निर्णय क्र.पीसीसी-३०१०/२२५/प्र.क्र.६६/नवि-२२, दि.७ जून २०१० नुसार पदोन्नती –

१. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/ पदविका (बी.ई.सिव्हील/डी.सी.ई.)
२. कार्यकारी अभियंता या पदावरील कामकाजाचा पदवीधारक असल्यास ७ वर्षे व पदविकाधारक असल्यास किमान १० वर्षाचा अनुभव.

सद्यस्थितीमध्ये या संवर्गामध्ये एक पद रिक्त असून श्री.पठाण आयुबखान अहमदखान, सहशहर अभियंता यांच्या दि.३०/०९/२०१८ रोजीच्या नियत वयोमान सेवानिवृत्तीमुळे आणखी एक पद रिक्त होत आहे. प्रस्तुतची पदे पदोन्नतीने भरणेबाबत दि.०४/०९/२०१८ व दि.१९/०९/२०१८ रोजी पदोन्नती सभा आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व कार्यकारी अभियंता (स्था) तसेच उपशहर अभियंता पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, आरक्षण, गोपनीय अहवाल, सेवा जेष्ठता आणि मत्ता व दायित्व इ. सेवा विषयक तपशील पडताळून श्री.निकम मकरंद ज्ञानोबा यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६००

मध्ये सह शहर अभियंता (स्था) पदावर स्थापत्य अभियंता संवर्गातील सेवाजेष्ठता व पदोन्नती संदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेल्या याचिका क्र.४२०६/२००८ क्र.४२०७/२००८, क्र.१५३१/२००९, क्र.१२२४८/२००९, क्र.२२५९/२०१५, क्र.४२३०/२०१८ आणि मे.आकुर्डी न्यायालय येथे न्यायप्रविष्ठ असलेली याचिका क्र.३२/२००८ व मे.औद्योगिक न्यायालय, पुणे येथे दाखल कंप्लेट युएलपी क्र.१७/२०१४ तसेच पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्य न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सेवाजेष्ठते नुसार पदोन्न्तीच्या कोठयातील खुल्या प्रवर्गाच्या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.विधी/मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देणेबाबत सर्वानुमते शिफारस केली आहे. सबब, श्री.निकम मकरंद ज्ञानोबा यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० मध्ये सह शहर अभियंता (स्था) पदावर स्थापत्य अभियंता संवर्गातील सेवाजेष्ठता व पदोन्नती संदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेल्या याचिका क्र.४२०६/२००८ क्र.४२०७/२००८, क्र.१५३१/२००९, क्र.१२२४८/२००९, क्र.२२५९/२०१५, क्र.४२३०/२०१८ आणि मे.आकुर्डी न्यायालय येथे न्यायप्रविष्ठ असलेली याचिका क्र.३२/२००८ व मे.औद्योगिक न्यायालय, पुणे येथे दाखल कंप्लेट युएलपी क्र.१७/२०१४ तसेच पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्य न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सेवाजेष्ठते नुसार पदोन्न्तीच्या कोठयातील खुल्या प्रवर्गाच्या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६७५/२०१८
दिनांक : १२/१०/२०१८ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.